RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ५, अंक ४५(३)] शुक्रवार, जुलै १९, २०१३/आषाढ २८, शके १९३५ [पृष्ठ ३, किंमत : रुपये २५.००

### असाधारण क्रमांक ९५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

### सार्वजनिक आरोग्य विभाग

जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, १०वा मजला, मुंबई ४०० ००१, दिनांक १८ जुलै २०१३

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मवैअ. २०११/प्र.क्र. ७८९/सेवा-३.—भारताचे संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवा प्रवेश) नियम, २००० यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी (सेवा प्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम, २०१३ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील वैद्यकीय अधिकारी सेवा प्रवेश नियम, २००० (यात यापुढे ज्यांचा निर्देश मुख्य नियम असा करण्यात आला आहे) याच्या नियम ३, उप नियम ब मध्ये खालील परंतुकाचा अंतर्भाव करण्यात यावा :—

"परंतु, मुख्य नियमातील नियम ३ मधील क (दोन) (ब) नुसार जिल्हा तांत्रिक सेवा, गट क मधील शैक्षणिक अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, दिनांक २८ मे २००१ च्या आदेशातील तरतुदीनुसार सदर नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकास गुणवत्तेनुसार पात्र व अर्हताधारक असल्यास त्यांची निवड समावेशनाने मुख्य नियमातील नियम ५ खालील प्रथम परंतुकातील तरतुदीच्या अधीन राहून करण्यात येईल."

३. मुख्य नियमातील नियम ४ नंतर खालील परंतुकाचा अंतर्भाव करण्यात यावा :—

"परंतु आणखी असे की, जर निवड पद्धतीने नियुक्तीसाठी मुख्य नियमातील नियम ३ मधील क (दोन) (अ) नुसार विहित शैक्षणिक अर्हताधारक आवश्यक संख्येइतके उमेदवार कोणत्याही टप्प्यावर उपलब्ध न झाल्यास भरतीसाठी विहित केलेले पद भरतीचे गुणोत्तर प्रमाण शिथिल करून सदरची पदे नामनिर्देशनाने मुख्य नियमातील नियम ३ मधील क (दोन) (अ) नुसार शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांमधून भरण्यात येतील.



Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

"आणखी अशीही तरतूद करण्यात येते की, सदर नियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास जिल्हा तांत्रिक सेवा, गट क मधील कार्यरत सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन पूर्ण झाल्यानंतर मुख्य नियमातील नियम ३ मध्ये नमूद सदर पदे पदोन्नतीने व नामनिर्देशनाने भरण्याचे गुणोत्तर प्रमाण अनुक्रमे ५:९५ असे राहील".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ता. मा. कोळेकर,
शासनाचे उप सचिव.

Scanned with CamScanner

Scanned with OKEN Scanner

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

G. T. Hospital Complex, 10th Floor, Mantralaya, Mumbai 400 001
dated the 18th July 2013

### *NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. MMO. 2011/CR-789/Service-3.—In exercise of the powers conferred by proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is, hereby pleased to make the following Rules, further to amend the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services, Group A (Recruitment) Rules, 2000 as follows, namely :—

1. These rules may be called the Medical Officer in Maharashtra Medical and Health Services Group A (Recruitment) (Third Amendment) Rules, 2013.

2. In Rule 3 of the Medical Officer in Maharashtra Medical Health Services Group A (Recruitment) Rules, 2000 (hereinafter referred to as "the Principal Rules"), after sub-rule (b), the following proviso shall be added, namely :—

"Provided that selection of the Medical Officers in the District Technical Services, Group C, possessing the qualifications mentioned in sub-clause (*b*) of clause (*ii*) of sub-rule (*c*) of rule 3 shall be made by absorbtion subject to fitness and eligibility as per the terms and conditions mentioned in Government Resolution Public Health Department No. SANGHAT- 1093 /C. R. 96/SEVA-6, dated 28th May 2001, as applicable on the day of commencement of the Maharashtra Medical and Health Services, Group-A, (Recruitment) (Third Amendment) Rules, 2013, and also subject to the provisions of the first proviso under rule 5 of the Principal Rules."

3. After Rule 4 of the Principal rules, after the first proviso, the following provisions shall be added namely :—

"Provided further that, if requisite number of candidates possessing the qualifications prescribed in sub-clause (*a*) of clause (*ii*) of sub-rule (*c*) of Rule 3 are not available for appointment by selection at any stage, then such posts shall be filled in by nomination from amongst the candidates, possessing qualification prescribed in sub-clause (*a*) of clause (*ii*) of sub-rule (*c*) of Rule 3 by relaxing the ratio prescribed for appointment to the post" :

"Provided also that, after absorbtion of all the Medical Officers in District Technical Services Group-C (Health) in service on the date of commencement of the Maharashtra Medical and Health Services, Group-A (Recruitment) (Third Amendment) Rules, 2013, appointment to the post mentioned in Rule 3 shall be made by promotion and nomination in ratio of 5:95".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

T. M. KOLEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

11

Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner